# <u>नागरिकांची सनद</u>

भाषा संचालनालय, मुंबई.

राजभाषा अधिनियम 1964 अन्वये राज्य शासनाने “मराठी भाषा” राजभाषा म्हणून घोषित केली आहे. शासन व्यवहारात मराठीचा वापर या शासनाच्या वैधानिक बाबींची पूर्तता करण्यासाठी भाषा संचालनालयाकडून विविध उपाययोजना करण्यात येतात.

भाषा संचालनालयाकडून पार पाडले जाणारे कामकाजात मुख्यत्वे करून पुढील बाबींचा समावेश आहे-

1. महाराष्ट्र विधानसभा विधेयके, महाराष्ट्र विधानपरिषद विधेयके, अध्यादेश आणि सर्व राज्य अधिनियम व त्याखालील तयार केलेले नियम, उपविधि यांचा मराठीमध्ये अनुवाद करणे, अनुवादित राज्य अधिनियम अद्ययावत करणे तसेच तो पुस्तकरूपात उपलब्ध करणे. विधानसभा/विधानपरिषद विधेयके, अध्यादेश आणि अधिनियम हिंदीमध्ये अनुवादित करणे.

2. महाराष्ट्र विधानमंडळाच्या अधिवेशनाच्या प्रारंभी करण्यात येणाऱ्या मा. राज्यपालांच्या अभिभाषणाचा अनुवाद करणे.

3. अर्थसंकल्पविषयक सर्व प्रकाशनांचा, शासनाने नियुक्त केलेल्या विविध समित्यांच्या व आयोगांच्या अहवालांचा तसेच भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या इंग्रजी अहवालांचा मराठी अनुवाद करून देणे.

4. विभागीय नियमपुस्तिका आणि सर्वसाधारण तसेच विशेष प्रमाण नमुने व प्रपत्रे यांचा मराठी अनुवाद करून देणे.

5. विद्यापीठीय स्तरावरील अभ्यासक्रम मराठीतून शिकविण्यासाठी उपयोगी ठरणारे प्रशासनिक, विधिविषयक, तांत्रिक व विज्ञानविषयक परिभाषा शब्दकोश तयार करणे.

6. सर्व केंद्रीय अधिनियमांचा मराठीत अनुवाद करणे, त्यास राजभाषा खंड, नवी दिल्ली यांची संमती घेऊन मा. राष्ट्रपतींच्या नावे भारत सरकारच्या राजपत्रात प्रसिद्ध करणे तसेच प्राधिकृत पाठ म्हणून पुस्तकरुपात प्रसिद्ध करणे.

7. शासकीय कार्यालयातील अमराठी भाषिक राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी एतदर्थ मंडळाच्या मराठी भाषा परीक्षा, तसेच हिंदी भाषा परीक्षा वर्षातून दोनदा आयोजित करणे, शासकीय सेवेतील इंग्रजी टंकलेखक व लघुलेखक तसेच लघुटंकलेखक यांच्यासाठी एतदर्थ मंडळाच्या मराठी टंकलेखन/लघुलेखन परीक्षा वर्षातून दोनदा आयोजित करणे.

8. शासकीय कार्यालयांतून दैनंदिन कामकाजात मराठीचा वापर होतो किंवा नाही याची पाहणी करण्यासाठी मंत्रालयीन विभाग, जिल्हा व विभागीय स्तरावरील शासकीय कार्यालये, महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व जिल्हा ग्रामीण यंत्रणा यांची प्रत्यक्ष तपासणी करणे व त्यांच्या अडचीणी दूर करणे.

9. भाषा संचालनालयाकडून भारताचे संविधान मराठीत अनुवादित केले असून मराठीमधील त्याच्या 7 आवृत्या प्रसिद्ध केल्या आहेत. त्याचप्रमाणे सन 2013-2014 या वर्षात भारताच्या संविधानाची सातवी द्विभाषी आवृत्ती इंग्रजी/मराठी अशा दोन्ही भाषांमध्ये प्रकाशित केली आहे.

10. शासन व्यवहारात मराठीचा सक्षमपणे वापर करण्याकरिता भाषा समृद्धिसाठी शब्दकोश/परिभाषाकोश या सारख्या पायाभूत सुविधांची निर्मिती करणे, यामध्ये प्रामुख्याने पुढील प्रकाशनांचा समावेश आहे :-

भाषा संचालनालयाने आतापर्यंत भारताचे संविधान मराठी व इंग्रजी द्विभाषी आवृत्ती, विविध विषयांचे व ज्ञान शाखांचे परिभाषा कोश, शब्दावल्या, शासन व्यवहार नित्योपयोगी लघुपुस्तिका व संक्षिप्त शेऱ्यांची लघुपुस्तिका प्रसिद्ध केलेल्या आहेत. यामध्ये शासन व्यवहारोपयोगी शब्दकोश-6, शासन व्यवहारोपयोगी मार्गदर्शक पुस्तिका-10, परिभाषा कोश-29, पारिभाषिक शब्दावल्या-5, इतर-2 यांसह 52 प्रकाशने प्रसिद्ध केलेली आहेत. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेले सर्व परिभाषा कोश, शासन व्यवहार कोश, न्यायव्यवहार कोश, या कार्यालयात उपलब्ध आहेत. तसेच हे शब्दकोश मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद येथील शासकीय ग्रंथागारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

भाषा विषयक विविध प्रकारचे सहाय्य करण्यासाठी व मौलिक सूचना देण्याकरिता शासनाने “भाषा सल्लागार समितीची” निर्मिती केली आहे. या समितीच्या मौलिक सूचना विचारात घेऊन भाषा संचालनालयाचे विविध उपक्रम हाती घेण्यात येतात. तसेच शासन व्यवहारात मराठी भाषेचा जास्तीत जास्त वार करण्यासंदर्भात शासकीय कार्यालयांची तपासणी करण्याचे कामही या कार्यालयामार्फत करण्यात येते. शासन निर्णय, क्रमांक भासस-2010/प्र.क्र.74/20-ब, दि. 22 जून, 2010 अन्वये भाषा सल्लागार समितीची स्थापना केली असून मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. भासस-2020/प्र.क्र.6/भाषा-1, दि. 30 डिसेंबर, 2021 अन्वये समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये 30 अशासकीय व 8 शासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य व केंद्रीय अधिनियमांचा मराठीत अनुवाद **:-**

महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, 1964 अन्वये सर्व प्रशासनिक व्यवहारात मराठीचा वापर करण्याचे धोरण अंमलात आणले आहे. त्याअनुषंगाने विधिविषयक कामकाजात देखील मराठीचा वापर करण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे. विधानमंडळात विधेयक मांडताना ते मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत मांडण्यात येते. विधेयकाचे कायद्यात रुपांतर करताना मराठी व इंग्रजीमध्ये सदर कायदा प्रसिद्ध करण्यात येतो. आतापर्यंत एकूण 474 राज्य अधिनियम (मराठी) राज्याच्या मुख्य संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच केंद्र शासनाचे प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम (Authoritative Text Act), 1973, अन्वये केंद्र शासनाच्या केंद्रीय कायद्यांच्या प्रादेशिक भाषेत प्राधिकृत अनुवाद करण्यात येतात. राजभाषा खंड, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्राथम्य सुचितील कंद्रीय अधिनियम अनुवादाकरिता प्राप्त झाल्यानंतर भाषा संचालनालयाकडून त्याचा मराठी अनुवाद करण्यात येतो. सदर अनुवादास, राजभाषा खंडाची मान्यता मिळाल्यानंतर मा. राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतो. मान्यतेनंतर कायद्यांचा प्राधिकृत पाठ व अनुवाद अधिकृतरीत्या राज्य शासनाकडून प्रसिद्ध करण्यात येतो. या प्रक्रियेनुसार आतापर्यंत 381 केंद्रीय अधिनियमांचा मराठीत अनुवाद करण्यात आलेला असून, त्यापैकी 175 केंद्रीय कायदे शासनाच्या मुख्य संकेतस्थळावर उपलब्ध आहेत व उर्वरित अधिनियम प्राधिकृत पाठ म्हणून प्रसिद्ध करण्याच्या विविध टप्प्यांवर आहेत.

**भाषा संचालनालय, मुंबई. (अधिकाऱ्यांची यादी व संपर्क दूरध्वनी)**

| अ.क्र. | पदनाम | कार्यालयीन दूरध्वनी व ईमेल |
|---|---|---|
| 1. | भाषा संचालक | 26417265 |
| 2. | भाषा उपसंचालक (अनुवाद व शब्दावली) | 26510331 |
| 3. | भाषा उपसंचालक (विधि) | 26510331 |
| 4. | सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) | 26552184 |
| 5. | सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) | 26552184 |
| 6. | सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) | 26552184 |
| 7. | सहायक भाषा संचालक (प्रशिक्षण व आस्थापना) | 26552184 |
| 8. | भाषा अधिकारी (हिंदी) | 26552184 |

**भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, नवी मुंबई/पुणे/नागपुर/ औरंगाबाद. (अधिकाऱ्यांची यादी व संपर्क दूरध्वनी)**

| अ.क्र. | पदनाम | कार्यालयीन दूरध्वनी व ईमेल |
|---|---|---|
| 1. | विभागीय सहायक भाषा संचालक, विभागीय कार्यालय, नवी मुंबई. | 27573542 divnewmum.dol-mh@gov.in bhasha.adhikari@gmail.com |
| 2. | विभागीय सहायक भाषा संचालक, विभागीय कार्यालय, पुणे | 020-26121709 divpune.dol-mh@gov.in |
| 3. | विभागीय सहायक भाषा संचालक, विभागीय कार्यालय, नागपूर | 0712-2564956 divngp.dol-mh@gov.in |
| 4. | विभागीय सहायक भाषा संचालक, विभागीय कार्यालय, औरंगाबाद | 0240-23631372 divawb.dol-mh@gov.in |

## कार्यपूर्तीचे वेळापत्रक

| कार्यासन क्रमांक | विषय | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती लावधीत सेवा पुरविली जाईल. | सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी (दालन क्रमांक व दूरध्वनी क्रमांक) | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्याचा दूरध्वनी क्रमांक व ईमेल आयडी |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| कार्यासन 5/6 | विद्यापीठीय स्तरावरील निरनिराळया शास्त्रीय व तांत्रिक विषयाचे परिभाषा कोश तयार करणे व भाषा संचालनालयाची अन्य प्रकाशने तयार करणे | --//-- | 1) उपसंचालक, भाषा संचालनालय, मुंबई.<br>2) सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली), भाषा संचालनालय, मुंबई.<br>3) पर्यवेक्षक, भाषा संचालनालय, मुंबई. | भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य,<br>दू.क्र. 26417265<br>director.dol-mh@gov.in |
| कार्यासन-7 | राज्यपालांचे अभिभाषण, शासनाचे आदेश, अधिसूचना, अधिनियम, शासकीय व अशासकीय विधेयके, अध्यादेश तसेच संकीर्ण प्रकरणांची हिंदी अनुवाद करणे. | तात्काळ कालमर्यादित कामे | 1) भाषा अधिकारी (हिंदी), भाषा संचालनालय, मुंबई.<br>2) पर्यवेक्षक (हिंदी), भाषा संचालनालय, मुंबई. | ----//---- |
| कार्यासन -8 | मा. राज्यपालांचे अभिभाषण, अध्यादेश, शासकीय व अशासकीय विधेयके, मराठी अनुवादाची कामे करणे. | --//-- | 1)भाषा उप संचालक(विधि), भाषा संचालनालय, मुंबई.<br>2) सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली), भाषा संचालनालय, मुंबई.<br>3) पर्यवेक्षक, भाषा संचालनालय, मुंबई. | --//-- |
| कार्यासन -9 | वित्त विभागामार्फत विधानमंडळात सादर केले जाणारे अर्थसंकल्पविषयक मागणी, अधिक खर्चाची मागणी, त्या त्या वर्षाच्या खर्चाचे पूरक विवरणपत्र यांसारख्या अर्थसंकल्पविषयक प्रकाशनांचा मराठी अनुवाद करणे, वित्तमंत्री यांचे अर्थसंकल्पीय भाषण. | --//-- | 1)भाषा उप संचालक, भाषा संचालनालय, मुंबई.<br>2) सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली), भाषा संचालनालय, मुंबई.<br>3) पर्यवेक्षक, भाषा संचालनालय, मुंबई. | --//-- |
| कार्यासन- 10 | केंद्रीय अधिनियम यांचा मराठी अनुवाद करणे, न्याय व्यवहार कोश | अनुवाद विहित कालमर्यादेत करून | 1)भाषा उप संचालक(विधि), भाषा संचालनालय, मुंबई. | --//-- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | तयार करणे. | देण्यात येतो. | 2) सहायक भाषा संचालक<br>(अनुवाद व शब्दावली),<br>भाषा संचालनालय, मुंबई.<br>3) पर्यवेक्षक,<br>भाषा संचालनालय, मुंबई. | |
| कार्यासन -12 (14/12) | विभागीय नियमपुस्तिका, प्रपत्रे इत्यादींचा अनुवाद करणे तसेच केंद्र, शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, मंडळे, महामंडळे, स्वायत्त संस्था यांच्याकडून येणारी खाजगी अनुवादाची कामे करणे. | --//-- | 1) सहायक भाषा संचालक<br>(अनुवाद व शब्दावली),<br>भाषा संचालनालय, मुंबई.<br>2) पर्यवेक्षक,<br>भाषा संचालनालय, मुंबई. | --//-- |
| कार्यासन -13 | शासनाचे विविध प्रकाराचे गोपनीय चौकशी अहवाल, लोकआयुक्तांचे अहवाल, प्रमाण नमुने, निवडणूक विषयक अनुवादाची कामे इ.संकीर्ण अनुवादाची कामे | अनुवादाची कामे तातडीची असल्याने तात्काळ करून देण्यात येतात. | 1) भाषा उप संचालक,<br>भाषा संचालनालय, मुंबई.<br>2) सहायक भाषा संचालक<br>(अनुवाद व शब्दावली),<br>भाषा संचालनालय, मुंबई.<br>3) पर्यवेक्षक,<br>भाषा संचालनालय, मुंबई. | --//-- |
| कार्यासन- 13-अ | प्रत्येक वर्षाचे वित्तीय लेखा, विनियोजन लेखा, ब्रोशर पुस्तिक, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल यांचा मराठी अनुवाद करणे. | --//-- | 1) भाषा उप संचालक,<br>भाषा संचालनालय, मुंबई.<br>2) सहायक भाषा संचालक<br>(अनुवाद व शब्दावली), भाषा संचालनालय, मुंबई.<br>3) पर्यवेक्षक, भाषा संचालनालय, मुंबई. | --//-- |
| कार्यासन-14 | 1.मुख्यालय तसेच विभागीय कार्यालये यांच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा विषयक बाबी.<br>2.ई-गव्हर्नन्स.<br>3.आस्थानाविषयक समन्वयाच्या सर्व बाबी.<br>4.माहितीचा अधिकार याअंतर्गत येणारे अर्ज. | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005 मधील प्रकरण क्र.3 च्या कलम 10 (1) मधील तरतुदीस अनुसरुन, तात्काळ नस्ती शक्यतो 4 दिवसात निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित नसलेल्या धारिकांवर 45 दिवसांच्या बाबतअंतर्भूत असलेल्या धारिकांवर 3 महिन्यांच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल. | 1) सहायक भाषा संचालक<br>(प्रशिक्षण व आस्थापना),<br>भाषा संचालनालय, मुंबई.<br>2) अधीक्षक,<br>भाषा संचालनालय, मुंबई. | --//-- |
| कार्यासन-15 | शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर या शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचे काम | --//-- | 1) सहायक भाषा संचालक<br>(प्रशिक्षण व आस्थापना), भाषा संचालनालय, मुंबई. | --//-- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | शासनाने या कार्यालयाकडे सोपविले आहे त्या अनुषंगाने शासकीय कार्यालये, निम-शासकीय कार्यालये, मंडळे महामंडळे, स्वायत्त संस्था या कार्यालयातून राजभाषा मराठीचा वापर किती प्रमाणात करण्यात येतो त्याची तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल शासनाला पाठवण्यात येतो. | | 2) अधीक्षक,<br>भाषा संचालनालय, मुंबई. | |
| कार्यासन-16 | 1.भाषा संचालनालयातील अधिकारी/ कर्मचारी यांची वेतन देयके तयार करणे.<br>2.देयकांच्या अनुषंगाने आवश्यक त्या हिशेबांच्या नोंदवह्या ठेवणे.<br>3.सेवापुस्तके अद्ययावत ठेवणे.<br>4.भाषा संचालनालयाच्या खर्चाचा ताळमेळ घालणे.<br>5.गट ड कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधीचे लेखे ठेवणे.<br>6.लेखापरीक्षेबाबतची सर्व प्रकारची कामे करणे.<br>7.कार्यरत व सेवनिवृत्त राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे करिता वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना लागू करणे.<br>8.अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनातून विहित वेळेत आयकर कपात करून भरणा करणे. | --//-- | 1) सहायक भाषा संचालक (प्रशिक्षण व आस्थापना),<br>भाषा संचालनालय, मुंबई.<br>2) अधीक्षक,<br>भाषा संचालनालय, मुंबई. | --//-- |
| कार्यासन-17 | 1 . भाषा संचालनालयामार्फत शासकीय सेवेतील राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी व अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या मराठी भाषा निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षा वर्षातून 2 वेळा घेण्यात येतात.<br>2.शासकीय सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी हिंदी भाषा निम्नश्रेणी व उच्चश्रेणी या परीक्ष माहे जून व डिसेंबर या महिन्यात घेण्यात येतात त्याबाबतचे सर्व कामकाज.<br>3. भाषा संचालनालयामार्फत शासकीय/निमशासकीय सेवेतील इंग्रजी लघुलेखक, लघुटंकलेखक, लिपिक टंकलेखक यांच्यासाठी घेण्यात येणाऱ्या मराठी लघुलेखन व टंकलेखन परीक्षा माहे एप्रिल व ऑक्टोबरमध्ये आयोजित करण्यात येतात त्याबाबतचे सर्व कामकाज. | --//-- | 1) सहायक भाषा संचालक (प्रशिक्षण व आस्थापना), भाषा संचालनालय, मुंबई.<br>2) अधीक्षक,<br>भाषा संचालनालय, मुंबई. | --//-- |
| कार्यासन-18 | मुंबई व महाराष्ट्र अधिनियमांचे अद्ययावतीकरण करणे व मुद्रण तसेच | विहित वेळेत ही कामे करण्यात येतात. | 1)भाषा उप संचालक (विधि), भाषा संचालनालय, मुंबई. | --//-- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | संहितीकरण करणे इत्यादी कामं. | | 2) सहायक भाषा संचालक, भाषा संचालनालय, मुंबई.<br>3) अधीक्षक, भाषा संचालनालय, मुंबई. | |

- अधिनियम व नियमांची माहिती **:-**

भाषा संचालनालयाकडून राज्य अधिनियम व केंद्रीय अधिनियमांचा मराठीत अनुवाद करण्यात येतो. आतार्पंत एकूण 474 राज्य अधिनियम (मराठी) व  381 केंद्रीय अधिनियमांचा मराठीत अनुवाद करण्यात आलेला असून,  त्यापैकी 175 केंद्रीय कायदे शासनाच्या मुख्य संकेतस्थळावर उपलब्ध आहेत व उर्वरित अधिनियम प्राधिकृत पाठ म्हणून प्रसिद्ध करण्याच्या विविध टप्प्यांवर आहेत.

विभागांतर्गत महत्त्वाच्या समित्या व मंडळे **:-**

1) महाराष्ट्र राज्याचे पुढील 25 वर्षांचे राजभाषा मराठीचे धोरण ठरविण्यासाठी भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या कोश/परिभाषा कोश यांमध्ये नवीन प्रचलित शब्दांची भर घालून परिभाषा कोश अद्ययावत करणे, नवीन परिभाषा कोशांची निर्मिती करणे, परिभाषा कोशांचे पुनर्मुद्रण, परिभाषेतील परिष्करणे, शब्द व्युत्पत्ती मराठी पारिभाषिक संज्ञांच्या समस्या सोडविणे यांसारखी कामे पार पाडण्यासाठी, भाषा अभिवृद्धीसाठी नवनवे उपाय व कार्यक्रम सुचविणे व त्या अनुषंगाने शासनाला मार्गदर्शन करण्यासाठी शासनाने शासन निर्णय क्रमांक भासस-2010/प्र.क्र.74/20-ब, दि.22 जून, 2010 अन्वये भाषा सल्लागार समितीची स्थापना केली आहे. मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.भासस-2020/प्र.क्र.6/भाषा-1, दि.30 डिसेंबर, 2021 अन्वये सदर समितीची  पुनर्रचना करण्यात आली आहे. भाषा सल्लागार समितीअंतर्गत खालीलप्रमाणे पाच उपसमित्या कार्यरत आहेत.

1. शासन व्यवहर कोश (सुधारित) उपसमिती
2. कृषिशास्त्र  परिभाषा कोश (सुधारित) उपसमिती
3. शिक्षणशास्त्र  परिभाषा कोश (सुधारित) उपसमिती
4. अर्थशास्त्र  परिभाषा कोश (सुधारित) उपसमिती
5. तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र  परिभाषा कोश (सुधारित) उपसमिती.

**2)** भाषा संचालनालयामार्फत राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा परीक्षा, हिंदी भाषा परीक्षा तसेच इंग्रजी टंकलेखक, लघुटंकलेखक, लघुलेखक यांच्यासाठी मराठी टंकलेखन परीक्षा व मराठी लघुलेखन परीक्षांचे आयोजन करण्यात येते. या परीक्षा वर्षातून दोन वेळा घेण्यात येतात. या सर्व परीक्षांचे निकाल मा. सचिव, मराठी भाषा यांच्या अंतिम मान्यतेने जाहीर करण्यात येतात.

- **भाषा संचालनालय, मुंबई या कार्यालयांतर्गत कार्यरत असलेल्या विभागीय कार्यालयांची यादी**.

**1.** भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, नवी मुंबई (कोकण विभाग)

**2.** भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, पुणे (पुणे व नाशिक विभाग)

**3.** भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, औरंगाबाद (औरंगाबाद विभाग)

**4.** भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, नागपूर(नागपूर व अमरावती विभाग).

**विभागीय कार्यालयांचे कामकाज :-**

**1.** भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या मराठी भाषा परीक्षा, राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या हिंदी भाषा परीक्षा, इंग्रजी टंकलेखक, लघुटंकलेखक, लघुलेखक यांच्या मराठी टंकलेखन व मराठी लघुलेखन परीक्षा आयोजित करणे.

**2.** शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर यासंदर्भात शासकीय कार्यालये, मंडळे, महामंडळे शासकीय कार्यालयांतून दैनदिन कामकाजात मराठीचा वापर होतो किंवा नाही याची तपासणी करण्यासाठी महामंडळे, जिल्हा व विभागीय स्तरावरील शासकीय कार्यालये, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद व जिल्हा ग्रामीण यंत्रणा यांची प्रत्यक्ष तपासणी करणे व त्यांच्या अडीअडचणी दूर करणे.

**3.** स्थानिक स्तरावरून प्राप्त झालेले मराठी अनुवादाचे काम करणे.

- **भाषा संचालनालय व भाषा संचालनालयाच्या अधिपत्याखालील नवी मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या विभागीय कार्यालयांसाठी नेमलेले जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची माहिती.**

| **कार्यालयाचे नाव व पत्ता** | **अपिलीय अधिकाऱ्याचे नाव व पदनाम** | **दूरध्वनी क्रमांक व इ-मेल आयडी क्रमांक** |
|---|---|---|
| भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, 5 वा मजला, डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-400051.<br>आणि<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, नवी मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद करिता | श्रीमती विजया ल. डोनीकर<br>भाषा संचालक | (022) 26417265 (वै.)<br>(022) 26552184 (का.)<br>bhashasanchalak@yahoo.in |

| **कार्यालयाचे नाव व पत्ता** | **जनमाहिती अधिकाऱ्याचे नाव व पदनाम** | **दूरध्वनी क्रमांक व इ-मेल आयडी क्रमांक** |
|---|---|---|
| भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, 5 वा मजला, डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-400051. | **1.** श्री. अ. वा. गिते, भाषा उपसंचालक (विधि)<br>**2.**श्री. चिं. हो. वसावे, सहायक भाषा संचालक (आस्थापना व लेखा)<br>**3.**श्री. श. कि. यादव, सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) | (022) 26552184<br>bhashasanchalak@yahoo.in<br>director.dol-mh@gov.in |
| भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई-400614. | श्री. यो. ल. शेट्ये, विभागीय सहायक भाषा संचालक | (022) 27573542<br>bhasha.adhikari@gmail.com<br>divnewmum.dol-mh@gov.in |
| भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, मध्यवर्ती इमारत, 2 रा मजला, पुणे-411001. | श्री. श. कि. यादव, प्र. विभागीय सहायक भाषा संचालक | (020) 26121709<br>bhashapune@gmail.com<br>divpune.dol-mh@gov.in |
| भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, प्रशासकीय इमारत, 2 रा मजला, सिव्हिल लाईन्स, नागपूर-440001. | श्री. ह. म. सुर्यवंशी, विभागीय सहायक भाषा संचालक | (0712) 2564956<br>bhashalanguagesngp@gmail.com<br>divngp.dol-mh@gov.in |
| भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, औरंगाबाद-431001. | श्री. बा. उ. जगताप, विभागीय सहायक भाषा संचालक | (0240) 2361372<br>divawb.dol-mh@gov.in |

**भाषा संचालनालयाच्या प्रकाशनांची यादी पुढीलप्रमाणे आहे :-**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | पदनाम कोश | 27 | स्थापत्य अभियांत्रिकी परिभाषा कोश |
| 2 | वित्तीय शब्दावली | 28 | भौतिकशास्त्र परिभाषा कोश |
| 3 | शासन व्यवहार कोश * | 29 | विद्युत अभियांत्रिकी परिभाषा कोश |
| 4 | प्रशासन वाक्प्रयोग * | 30 | कृषिशास्त्र परिभाषा कोश |
| 5 | प्रशासनिक लेखन | 31 | जीवशास्त्र परिभाषा कोश |
| 6 | राजभाषा परिचय | 32 | शरीरक्रियाशास्त्र परिभाषा कोश |
| 7 | राजभाषा परिचय कार्यरूप व्याकरण | 33 | राज्यशास्त्र परिभाषा कोश |
| 8 | शासन व्यवहारात मराठी | 34 | साहित्य समीक्षा परिभाषा कोश |
| 9 | मराठी लघुलेखन | 35 | लोकप्रशासन परिभाषा कोश |
| 10 | मराठी लघुलेखन मार्गदर्शिका | 36 | अर्थशास्त्र परिभाषा कोश |
| 11 | मराठी टंकलेखन प्रवेशिका | 37 | धातुशास्त्र परिभाषा कोश |
| 12 | कार्यदर्शिका * | 38 | मानसशास्त्र परिभाषा कोश |
| 13 | प्रमाणलेखन नियमावली | 39 | व्यवसाय व्यवस्थापन परिभाषा कोश |
| 14 | मंथन | 40 | संख्याशास्त्र परिभाषा कोश |
| 15 | भारताचे संविधान | 41 | औषधशास्त्र परिभाषा कोश |
| 16 | न्याय व्यवहार कोश * | 42 | भूगोलशास्त्र परिभाषा कोश |
| 17 | ग्रंथालयशास्त्र परिभाषा कोश | 43 | वृत्तपत्रविद्या परिभाषा कोश |
| 18 | गणितशास्त्र परिभाषा कोश | 44 | न्यायवैद्यक व विषशास्त्र परिभाषा कोश |
| 19 | समाजशास्त्र परिभाषा कोश | 45 | भाषाविज्ञान व वाङमयविद्या परिभाषा कोश |
| 20 | तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश | 46 | शासन व्यवहार शब्दावली |
| 21 | वाणिज्यशास्त्र परिभाषा कोश | 47 | भौतिकशास्त्र पारिभाषिक शब्दावली |
| 22 | रसायनशास्त्र परिभाषा कोश | 48 | कृषिशास्त्र पारिभाषिक शब्दावली |
| 23 | भूशास्त्र परिभाषा कोश | 49 | विकृतिशास्त्र पारिभाषिक शब्दावली |
| 24 | शारीर परिभाषा कोश | 50 | वाणिज्यशास्त्र पारिभाषिक शब्दावली |
| 25 | शिक्षणशास्त्र परिभाषा कोश | 51 | संक्षिप्त शेऱ्यांची लघुपुस्तिका |
| 26 | यंत्र अभियांत्रिकी परिभाषा कोश | 52 | शासन व्यवहार नित्योपयोगी लघुपुस्तिका |

*भाषा संचालनालयाच्या “shasanshabdkosh-bhag-1” या भ्रमणध्वनी उपयोजकावर विनामूल्य उपलब्ध. (शासन व्यवहार कोश, न्याय व्यवहार कोश, कार्यदर्शिका, प्रशासन वाक्प्रयोग)

3,00,000 पेक्षा जास्त शासकीय व व्यावहारिक इंग्रजी-मराठी शब्दांचे कोश /परिभाषा कोश आता मोबाईलवर ! आजच डाऊनलोड करा. http:play.google.com/store/apps/details?id=io.marathi.shabdakosh.

**भाषा संचालनालय व भाषा संचालनालयाच्या अंतर्गत असलेल्या चार विभागीय कार्यालयाच्या संरचनेचा तक्ता (मंजूर पदे)**

**भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

**भाषा संचालक (गट-अ) 1 पद**

**मुख्यालय (मुंबई)**

### अनुवाद व परिभाषा निर्मिती शाखा

- भाषा उपसंचालक (विधि) (गट-अ) 1 पद
- सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) (गट-ब) 4 पदे
- पर्यवेक्षक(मराठी) (गट-क) 9 पदे
- अनुवादक (मराठी) (गट-क) 35पदे

हिंदी अनुवाद शाखा

- भाषा अधिकारी (हिंदी) (गट-ब) 1 पद
- पर्यवेक्षक (हिंदी) (गट-क) 1 पद
- अनुवादक (हिंदी) (गट-क) 4 पदे

### लिपिक वर्गीय शाखा

- सहायक संचालक (प्रशिक्षण व आस्थापना) (गट-ब) 1 पद
- अधीक्षक (गट-क) 3 पदे
- वरिष्ठ लिपिक (गट-क) 6 पदे
- लिपिक-टंकलेखक (गट-क) 12 पदे
- कनिष्ठ ग्रंथपाल (गट-क) 1 पद
- वाहन चालक 2 पदे
- नाईक (गट-ड) 2 पदे
- शिपाई (गट-ड) 8 पदे

- उच्चश्रेणी लघुलेखक 1 पद
- निम्नश्रेणी लघुलेखक 1 पद
- लघु-टंकलेखक- (गट-क) 1 पद

### विविध चार विभागीय कार्यालये

| विभागीय कार्यालय, नवी मुंबई | विभागीय कार्यालय, पुणे | विभागीय कार्यालय, नागपूर | विभागीय कार्यालय, औरंगाबाद |
|---|---|---|---|
| विभागीय सहायक भाषा संचालक (गट-ब) 1 पद | विभागीय सहायक भाषा संचालक (गट-ब) 1 पद | विभागीय सहायक भाषा संचालक (गट-ब) 1 पद | विभागीय सहायक भाषा संचालक (गट-ब) 1 पद |
| अधीक्षक (गट-क) 1 पद | अधीक्षक (गट-क) 1 पद | अधीक्षक (गट-क) 1 पद | अधीक्षक (गट-क) 1 पद |
| अनुवादक (मराठी) (गट-क) 1 पद | अनुवादक (मराठी) (गट-क) 2 पदे | अनुवादक (मराठी) (गट-क) 2 पदे | अनुवादक (मराठी) (गट-क) 2 पदे |
| वरिष्ठ लिपिक (गट-क) 1 पद | वरिष्ठ लिपिक (गट-क) 1 पद | वरिष्ठ लिपिक (गट-क) 1 पद | वरिष्ठ लिपिक (गट-क) 1 पद |
| लिपिक-टंकलेखक (गट-क) 1 पदे | लिपिक-टंकलेखक (गट-क) 2 पदे | लिपिक-टंकलेखक (गट-क) 2 पदे | लिपिक-टंकलेखक (गट-क) 1 पदे |
| शिपाई (गट-ड) 1 पद | शिपाई (गट-ड) 2 पदे | शिपाई (गट-ड) 2 पदे | शिपाई (गट-ड) 2 पदे |